शिक्षण संचालकांच्या ८ पदांपैकी एका पदाचे रुपांतर “आयुक्त शिक्षण” म्हणून करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २४१३ /प्र.क्र.५०/१३ / प्रशा-५

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

तारीख: १८ ऑक्टोबर, २०१३

**संदर्भ:-** **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक- संकीर्ण- १००२/ (१५९/०२/ प्रशा-५, दिनांक १७ मार्च,२००३.**

**प्रस्तावना —**

राज्यामध्ये सर्व मुला-मुलींना इयत्ता पहिली ते बारावीचे शिक्षण योग्यरितीने मिळावे यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याची सर्व जबाबदारी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची आहे. याकरीता राज्य,विभाग, जिल्हा, तालुका व केंद्रस्तरावर आवश्यक ती यंत्रणा उभारण्यात आली असून कामकाजाची विभागणीपण करण्यात आली आहे.

२. शालेय शिक्षण विभागांतर्गत सुरुवातीला फक्त २ संचालकांमार्फत सर्व कामकाज हाताळण्यात येत होते. मात्र आवश्यकतेप्रमाणे यामध्ये वाढ करुन सुधारीत आकृतीबंध संदर्भीय शासन निर्णय, दिनांक १७ मार्च,२००३अन्वये मंजूर करण्यात आला. सध्या राज्यात ८ संचालक, १८ सहसंचालक व ४२ उपसंचालकांची पदे मंजूर असून ८ संचालकांचे सध्याचे मुख्य कामकाज थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.:-

| संचालक | प्रचलित कामकाज |
|---|---|
| १) संचालक,प्राथमिक शिक्षण (शासकीय) | प्राथमिक शिक्षणाशी (इयत्ता १ ली ते ७ वी ) संबंधीत संपूर्ण कामकाजाची अंमलबजावणी तसेच नियंत्रण. |
| २) संचालक,माध्य. व उच्च माध्य. शिक्षण (शासकीय) | माध्यमिक शिक्षणाशी ( इयत्ता ५वी ते १२ वी ) संबंधीत संपूर्ण कामकाजाची अंमलबजावणी तसेच नियंत्रण. |

| संचालक | प्रचलित कामकाज |
|---|---|
| ३) संचालक,अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण (शासकीय ) | काही जिल्हयांमध्ये सुरु असलेल्या साक्षर भारत योजनेचे कामकाज तसेच अल्पसंख्यांक विषयक संपूर्ण कामकाज |
| ४) संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (शासकीय ) | शिक्षक प्रशिक्षण, डीएड विद्यालय व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या कामकाजाबाबत. |
| ५) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (स्वायत्त ) | इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या वार्षिक परीक्षा आयोजित करणे तसेच पुस्तक निर्मिती करणे |
| ६) संचालक,पाठय पुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ (बालभारती ) (स्वायत्त ) | पाठयपुस्तकांची अभ्यासक्रमासह निर्मिती करणे |
| ७) संचालक,राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (बालचित्रवाणी ) (स्वायत्त ) | दृकश्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे. उदा. सीडी |
| ८) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, (स्वायत्त ) | इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करणे तसेच लिपिक संवर्गासाठीच्या परीक्षा आयोजित करणे इत्यादि. |

या सर्व संचालकांचे मुख्यालय पुणे येथे आहे.

३. संचालकांच्या कामाच्या वरील विभागणीबाबत काही काळापासून शासनाच्या निदर्शनास खालील महत्वाचे प्रश्न आणण्यात आले आहेत. :-

i) प्रत्येक संचालक स्वत:च्या कामाकडे लक्ष देतात परंतू शिक्षणामध्ये सुधारणा करण्याची बाब एकत्रितपणे कोणीही हाताळत नाहीत.

ii) प्रत्येक संचालकांचे वेगळे अस्तित्व व वेगळे काम असल्याने ते बऱ्याचदा परस्पर विरोधी भूमिका घेतात.

iii) ८ संचालकांमध्ये आवश्यकतेप्रमाणे समन्वयाचा अभाव

iv) अनेक महत्वाचे विषय आमचा नाही, म्हणून दुलर्क्षित.

v) काही संचालकांकडे तुलनेने अत्यंत अल्प कामकाज

vi) अनेक महत्वांच्या बैठकांमध्ये जवळजवळ २ ते ३ संचालक उपस्थित रहातात इत्यादि .

४. एका बाजूला काही संचालकांकडे अल्प काम असताना दुसऱ्या बाजूला अधिकच्या पदांची मागणी, ८ संचालकांमध्ये समन्वयाचा अभाव, शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये वाढ व सर्वांना समान कार्यभार इत्यादि बाबी बाबत कोणती उपाययोजना करावी ही बाब शासनाच्या अनेक दिवसांपासून विचाराधीन होती.

५. शिक्षण क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षात खाली दर्शविल्याप्रमाणे अनेक महत्वाच्या घडामोडी घडलेल्या आहेत.:-

i) भारतीय राज्य घटनेत २००२ साली दुरुस्ती करण्यात आली असून ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण हा त्यांचा मूलभूत हक्क करण्यात आला आहे.

ii) केंद्र पुरस्कृत **“ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ ”**ची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल २०१० पासून सुरु करण्यात आली असून ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण ( इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत ) देणे क्रमप्राप्त झाले आहे.

iii) शालेय पोषण आहार योजना “ अन्न सुरक्षा अधिनियम २०१३” द्वारे राज्य शासनावर बंधनकारक झालेली आहे इत्यादि.

६. वरील घडामोडींमुळे विद्यार्थी हा केंद्रबिंदू म्हणून त्यांच्यावर जास्त लक्ष देणे व शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये जागतिक स्तराप्रमाणे वाढ करणे आवश्यक असल्याने संचालक, सह/उप संचालक

यांच्या कामाच्या विभागणीमध्ये सुधारणा करणे अपरिहार्य झालेले आहे. अनावश्यक जुनी कामे न हाताळता नवीन कामे हाताळणे अगत्याचे झालेले आहे.

७. वरील सर्व बाबींचा विचार करुन पुणे येथील संचालकांमध्ये समन्वय साधण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी एकत्रितपणे उपाययोजना करण्यासाठी शासनाने पहिले पाऊल म्हणून **"आयुक्त शिक्षण "** पद निर्माण करण्याचा खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.:-

## शासन निर्णय—

१. सद्य:स्थितीत पुणे येथे मंजूर ८ संचालकांच्या पदापैकी **" संचालक,राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (बालचित्रवाणी )"** या पदाचे रुपांतर **"आयुक्त शिक्षण"** म्हणून करण्यात येत आहे.

२. या पदावर रु.३७४००-६७०००,ग्रे.वे. रु.१०,०००/- या वेतनश्रेणीत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यामधून नेमणूक करण्यात येईल.

३. संचालकांच्या एका पदाचे रुपांतरण **"आयुक्त शिक्षण"** असे केल्याने संचालक संवर्गात अतिरिक्त ठरलेल्या अधिकाऱ्यांबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

४. **"आयुक्त शिक्षण"** यांची मुख्य कामे खालीलप्रमाणे राहतील:-

(i) पुणे येथील उर्वरीत संचालकांच्यामध्ये समन्वय साधणे

(ii) सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

(iii) शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी एकत्रितपणे सर्व उपाययोजना इत्यादि.

५. **"आयुक्त शिक्षण "** हे शालेय शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेचा प्रमुख म्हणून काम करतील व सर्व प्रशासकीय, अर्थसंकल्पीय इत्यादि बाबींवर नियंत्रण ठेवतील.

६. पुणे येथील उर्वरित सर्व संचालक **" आयुक्त शिक्षण "** यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

७. **"आयुक्त शिक्षण"** यांचे मुख्यालय पुणे येथे राहील.

८. उर्वरित संचालकांच्या कामाचे व मनुष्यबळाचे पुर्न:वाटप करण्याबाबत स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे. तो पर्यंत **"आयुक्त शिक्षण"** यांना त्वरित कामकाज सुरु करण्यासाठी संचालक ( माध्यमिक) यांनी खालील बाबी उपलब्ध करुन द्याव्यात.:-

i) सुसज्ज कार्यालय

ii) आवश्यक तो अधिकारी /कर्मचारी वृंद

iii) वाहन

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०१८१२१०२७२९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Phadke Milind K
Digitally signed by Phadke Milind K
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Phadke Milind K
Date: 2013.10.18 14:51:47 +05'30'

**(मि.का.फडके)**

उप सचिव महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई,

२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

४. सर्व विधान परिषद/विधान सभा सदस्य,

५. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

६. मुख्य सचिव यांचे उप सचिव,

७. सर्व मंत्रालयीन विभाग,

८. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,

९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,

१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय( विधान परिषद),मुंबई,

११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय( विधान सभा),मुंबई,

१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई ( २ प्रती प्रसिध्दीकरीता )

१३. सर्व शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे,

१४. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई,

१५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

१६. सर्व आयुक्त,महानगरपालिका,

१७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१८. सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

१९. सर्व शिक्षणाधिकारी,

२०. सर्व मुख्यअधिकारी नगरपालिका

प्रत, माहितीसाठी अग्रेषित.

१) मा. मंत्री ( शा.शि.) यांचे खाजगी सचिव

२) मा.राज्यमंत्री ( शा.शि.) यांचे खाजगी सचिव

३) मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक

४) अ.मु.स. ( शा.शि.) यांचे स्वीय सहायक

५) अ.मु.स. ( सा.प्र.वि.) यांचे स्वीय सहायक

६) निवडनस्ती